**SPB**
**SHRI PISARNATH BROADBAND**
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२



दैनिक **अक्षराज** अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध   Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : ३१८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२९ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# शिवरायांचा काळ जिवंत अनुभवता येणार, १२ किल्ल्यांवर ऐतिहासिक महोत्सव


**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, रायगड :** युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ ऐतिहासिक किल्ल्यांवर राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत भव्य 'गडकिल्ले महोत्सव' आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्राच्या दुर्गवैभवाचा जागतिक गौरव साजरा करण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या या उपक्रमासाठी राज्य शासनाने ६० लाख रुपयांच्या खर्चास वित्तीय मान्यता दिली आहे. प्रत्येक किल्ल्यासाठी ५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयामुळे वारसा पर्यटनाला नवे बळ मिळणार असून शिवकालीन इतिहास, संस्कृती आणि परंपरेचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार होण्यास मदत होणार आहे.

मराठा साम्राज्याच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारे रायगड, शिवनेरी, खांदेरी, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, जिंजी, प्रतापगड, पन्हाळा, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग आणि राजगड या १२ किल्ल्यांचा नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश झाला आहे. या ऐतिहासिक सन्मानानंतर या दुर्गांचे महत्त्व देश-विदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचविणे आणि दुर्गसंवर्धनाबाबत जनजागृती निम र्ण करणे, या उद्देशाने राज्य शासनाने गडकिल्ले महोत्सव आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

**महोत्सांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित होणार**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने



यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच जारी केला आहे. या महोत्सवांमध्ये महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध लोककला प्रकार, पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम, शिवकालीन इतिहासावर आधारित नाट्यप्रयोग, व्याख्याने, दुर्गसंवर्धन विषयक उपक्रम, ऐतिहासिक प्रदर्शने तसेच किल्ल्यांचा इतिहास उलगडणारे माहितीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे पर्यटकांना केवळ ऐतिहासिक वास्तूंचे दर्शनच नव्हे, तर शिवकालीन वारशाचा जिवंत अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

**स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळणार...**

या उपक्रमाचा विशेष लाभ रायगड जिल्ह्याला होणार आहे. राज्याची राजधानी राहिलेल्या रायगड किल्ल्यासह खांदेरी किल्ल्यावर विशेष सांस्कृतिक म होत्सव रंगणार आहे. याशिवाय सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग या सागरी किल्ल्यांवर तसेच रत्नागिरीतील सुवर्णदुर्गावरही विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या महोत्सवामुळे स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मि ळेल, तर पर्यटन, हॉटेल व्यवसाय, स्थानिक हस्तकला आणि अन्य पूरक व्यवसायांनाही मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**शिवरायांचा पराक्रम जगभरात पोहोचवण्याचा प्रयत्न**

युनेस्कोच्या मानांकनानंतर म हाराष्ट्राच्या दुर्गवैभवाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. आता गडकिल्ले महोत्सवाच्या माध्यमातून हा ऐतिहासिक वारसा अधिक व्यापक स्वरूपात देश-विदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. इतिहास, संस्कृती आणि पर्यटन यांचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमामुळे वारसा संवर्धनाला गती मिळेल, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि शिवरायांच्या पराक्रमाची गाथा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# बिलोलीच्या आठवडी बाजारांची दुरवस्था; मूलभूत सुविधांसाठी शेतकऱ्यांची जोरदार मागणी

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२८, बिलोली :** बिलोली शहरातील रविवार, मंगळवार आणि गुरुवार या दिवशी भरणाऱ्या आठवडी बाजारांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून, बाजारातील शेतकरी व विक्रेते यांना अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नगरपरिषद व शासनाने तातडीने बाजार परिसरात आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

रविवारच्या भाजीपाला बाजारात शेतकऱ्यांसाठी पूर्वी बांधण्यात आलेले चौकोनी दगडी वटे (बैठकीची ठिकाणे) सध्या तुटलेले व मोडकळीस आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल विक्रीसाठी मांडताना व बसताना



मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या वट्यांची तातडीने दुरुस्ती करून नियोजनबद्ध पद्धतीने बसण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

बिलोली शहरात दर आठवड्याला तीन प्रमुख बाजार भरतात. रविवार व गुरुवार या दिवशी भाजीपाला बाजार, तर मंगळवारी जनावरांचा बाजार भरतो. या तिन्ही बाजारांमध्ये दररोज मोठ्या संख्येने शेतकरी, व्यापारी व नागरिक येत असल्याने मूलभूत सुविधांची नितांत गरज आहे.

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार बाजार परिसरात पुरेशी प्रकाश व्यवस्था, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, सांडपाण्याचा योग्य निचरा, स्वच्छता आणि शेतकरी व ग्राहकांसाठी बसण्याची व्यवस्था तातडीने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

शेतीमाल विक्रीसाठी बाजारपेठा हे शेतकऱ्यांचे प्रमुख केंद्र असून, त्यावर हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. त्यामुळे शासन आणि संबंधित नगरपरिषद प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन आवश्यक दुरुस्ती व विकासकामे तातडीने हाती घ्यावीत, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

शेतकऱ्यांना सन्मानाने व सुरक्षित वातावरणात आपला माल विकता यावा, यासाठी आठवडी बाजारांमध्ये सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी एकमुखी मागणी बिलोली परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदीराची पाहणी



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२८, पंढरपूर :** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धन करण्यासाठी मंदिर विकास आराखड्यातून पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली कामे सुरू असून, मंदिर विकास आराखड्यातून झालेल्या कामांची तसेच करण्यात येणाऱ्या कामांची पाहणी करून माहिती घेतली तसेच सद्यस्थितीत सुरू असलेली कामे आषाढी यात्रेपूर्वी पूर्ण करावीत जेणेकरून दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, आळंदी देवस्थानाचे विश्वस्त योगी निरंजननाथ, समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम उपस्थित होते.

यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदिर जतन व संवर्धन आराखड्यातून सुरू असलेल्या कामांची माहिती दिली.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुखदर्शन घेतले तदनंतर मंदिर समितीच्या वतीने सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते श्रींची मूर्ती व उपरणे देऊन सत्कार करण्यात आला.

# आषाढी वारी २०२६ : पालकमंत्री जयकुमार गोरेंचा 'स्वच्छता व सुविधा'चा नारा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२८, पंढरपूर :** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी होत असून, या महायात्रेच्या पार्श्वभूमीवर ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज पंढरपूर व वाखरी येथील प्रम ुख पालखीतळ व दर्शन मार्गांची सखोल पाहणी केली. 'यंदाच्या वारीत लाखो वारकरी-भाविक येणार आहेत. त्यांना पायाभूत सुविधांबरोबरच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्या. कुठेही गैरसोय होता कामा नये,' असा स्पष्ट व कडक आदेश पालकमंत्री गोरे यांनी प्रशासनातील सर्व विभाग प्रमुखांना दिला.

सकाळी ११ वाजता पालकमंत्री गोरे यांचे पंढरपूरम ध्ये आगमन झाले. त्यांनी थेट वाखरी येथील मुख्य पालखीतळ, भक्ती सागर (६५ एकर) परिसर व चंद्रभागा नदीचे वाळवंट या तीनही महत्त्वाच्या ठिकाणांची पायी फिरून पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जि.प. उएज कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, वीज वितरण, नगरपालिका, आरोग्य विभागाचे सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पाहणीनंतर पत्रकारांशी बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले, 'गतवर्षी आषाढी यात्रा कालावधीत प्रशासनाने वाखरी पालखीतळ व ६५ एकर येथे वारकरी-भाविकांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन. मात्र यंदा वारकऱ्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे गतवर्षीपेक्षा अधिकच्या व अधिक दर्जेदार सुविधा उभ्या करा. वारी सुरू होण्यापूर्वीच सर्व कामे १००% पूर्ण झाली पाहिजेत.'

कॉलेज चौकातील उड्डाणपुलाच्या अपूर्ण काम ावर पालकमंत्री कमालीचे संतापले. 'या पुलाचे काम



अनेक महिन्यांपासून रखडले आहे. कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राडाराडा, दगड-माती पडली आहे. यामुळे अपघात होऊन वारकऱ्यांचा जीव जाऊ शकतो. संबंधित ठेकेदाराने हे काम तात्काळ व युद्धपातळीवर पूर्ण करावे. जर ८ दिवसांत काम सुरू झाले नाही, तर त्या ठेकेदाराचा काळ्या यादीत समावेश करून त्याच्यावर फौजदारी कारवाई केली जाईल. तसेच हे काम करण्यासाठी नवीन, कार्यक्षम ठेकेदार नेमावा,' असा सज्जड दमच गोरे यांनी भरला.

शहरातील अंतर्गत रस्ते, डिव्हायडर व दर्शनबारी मार्ग स्वच्छ ठेवण्याचे आदेश देताना गोरे म्हणाले, 'सर्व मुख्य रस्ते झाडून स्वच्छ करा. डिव्हायडरला भगवा व पांढरा रंग देऊन सुशोभित करा. सरगम चौकातील पुलाखालून वाळवंटापर्यंत जाणारा रस्ता नगरपालिकेने तातडीने डांबरीकरण करून तयार करावा. चंद्रभागा पत्राच्या काठावरील सर्व काटेरी झाडे-झुडपे जेसीबी लावून काढून टाका. मातीचे ढिगारे हटवून संपूर्ण वाळवंट सपाट करा, जेणेकरून भाविकांना स्नानासाठी त्रास होणार नाही.'

**'निधीची कमतरता नाही, फक्त काम दिसले पाहिजे'**

'आषाढी वारीसाठी राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात निधी मंजूर केला आहे. पैशांची कुठेही कमतरता पडू देणार नाही. मात्र तो निधी योग्य ठिकाणी व वेळेत खर्च झाला पाहिजे. जिल्ह्यात पहिली पालखी दाखल होण्यापूर्वीच सर्व पायाभूत सुविधा - रस्ते, पाणी, लाईट, शौचालय, आरोग्य - १००% सज्ज ठेवा,' अशी ताकीद पालकमंत्र्यांनी दिली.

भक्ती सागर (६५ एकर) येथील नियोजनाबाबत बोलताना गोरे म्हणाले, 'येथे येणाऱ्या लाखो भाविकांसाठी तात्पुरत्या निवासाची, महाप्रसादाची, पिण्याच्या पाण्याची, फिरत्या शौचालयांची व्यवस्था गतवर्षीपेक्षा दुप्पट करा. येथील संपूर्ण परिसर २४ तास स्वच्छ राहील यासाठी विशेष पथक नेमा. वीज पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्या.' या पाहणी दौऱ्यात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, DySP प्रशांत डगळे, DPO दिलीप पवार, नगरपालिका आयुक्त आशिष लोकरे, अन्न पुरवठा अधिकारी ओंकार पाडोळे, SE सुनील माने, RTO गजानन नेरपगार यांच्यासह सर्व खातेप्रमुख हजर होते.

**पालखी तळासाठी ८ कलमी आदेश**

**वाखरी पालखीतळाबाबत पालकमंत्र्यांनी प्रशासनाला तातडीचे ८ निर्देश दिले :**

**कॉंक्रिटीकरण :** कायमस्वरूपी शौचालय परिसरात कॉंक्रिटीकरण करावे.

**सपाटीकरण :** पालखीतळावरील सर्व खड्डे बुजवून मुरूम टाकून सपाटीकरण करावे.

**पाणी निचरा :** पावसाचे पाणी साचू नये यासाठी कायमस्वरूपी गटार व उताराची व्यवस्था करावी.

**प्रकाश व्यवस्था :** संपूर्ण पालखीतळावर पुरेसा व दर्जेदार प्रकाश झोत टाकावा.

**पिण्याचे पाणी :** प्रत्येक १०० मीटरवर स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था.

**वैद्यकीय कक्ष :** २४ तास डॉक्टरांसह ॲम्ब्युलन्स तैनात ठेवावी.

**स्वच्छता :** दर २ तासांनी संपूर्ण परिसराची सफाई करणारी टीम नेमावी.

**सूचना फलक :** मराठी, हिंदी, इंग्रजीतून दिशादर्शक व माहिती फलक लावावेत.

# माऊलींचे रथाला बैलजोड सेवेचा वाद अखेर मिटला



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, आळंदी :** श्री. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या आषाढ पायी वारी पालखी सोहळ्यासाठी बैलजोड सेवा देण्याच्या मागणीतील तिन्ही अर्जा नुसार तीनही अर्जदार यांना सेवेची संधी देऊन बैल जोड निवड समितीने अखेर वाद मिटविला आहे. आळंदी येथून श्रींचा पालखी सोहळा निघाल्या नंतर येताना व जाताना पुणे जिल्हा, सातारा जिल्हा, सोलापूर जिल्हा या प्रमाणे सेवा देण्याची संधी आळंदीतील रानवडे परिवारास देण्यात आली आहे.

या नुसार अनुक्रमे हर्षवर्धन रानवडे पुणे जिल्हा, उमेश रानवडे सातारा जिल्हा, तुळशीराम रानवडे सोलापूर जिल्हा या प्रमाणे पालखी सोहळ्यात त्या त्या जिल्ह्यातून जाताना व येताना श्रींचे पालखी रथाला बैलजोड सेवा देणार आहे. अशी माहिती बैलजोड निवड समिती आळंदीकर ग्रामस्थ अध्यक्ष माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे पाटील यांनी समितीचे वतीने दिली. या साठी मंदिरात एक ठराविक जणांची संवाद बैठक झाली. या बैठकीत संबंधित घटकांचे पदाधिकारी उपस्थित होते.




## अनंत वाचाळ बरळती बरळ

महाराष्ट्राच्या विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिवंगत गायिका आशा भोसले यांच्याविषयीचा शोकप्रस्ताव वाचून दाखविताना मराठीची लक्तरेच वेशीवर टांगली. मातृभाषेबद्दल अभिमान बाळगणाऱ्या कोणत्याही मराठी माणसाची मान शरमेने खाली जाईल, असाच हा प्रकार. कारण, मराठी भाषक राज्याच्या विधिमंडळ रचनेतील सर्वोच्च पदावरील व्यक्तीला, त्यातही सुशिक्षित-सुसंस्कृत मराठी माणसाला मराठीच नीट बोलता-वाचता येत नसेल, तर सारेच मुसळ केरात गेले म्हणायचे. राज्यात रोजीरोटी कमावणाऱ्या परप्रांतीयांकडून मराठी बोलण्याचा आग्रह तरी कसा धरायचा, हा प्रश्नही कोणा सामान्यांच्या मनात येणे साहजिक. तसा तो हिंदी भाषक रिक्षावाल्यांकडून मराठी वदवून घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या राजकीय पक्षांच्या नेत्यांच्याही मनात आला की नाही, हे कळायला मार्ग नाही. नार्वेकरांच्या या भाषिक दिवाळखोरीच्या घटनेपाठोपाठ शिवसेनेचे एक वादग्रस्त खासदार संजय दीना पाटील यांनी गाजवलेली तोंडपाटीलकी आठवडाभर चर्चेत राहिली. वृत्तवाहिन्यांच्या काही प्रतिनिधींना उद्देशून त्यांनी जी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली, कॅमेऱ्यापुढे थेट धमकी दिली, त्यामुळे एकूणात राजकीय नेतेमंडळींचा घसरलेला स्तर, विचारांचे अवमूल्यन आणि त्यांच्या मतदार व जनसामान्यांविषयी बेपर्वा वागणुकीची चर्चा होऊन टीकेची वावटळ उठली. शेवटी दिलगिरीचे सोपस्कार उरकले असले तरी पुढाऱ्यांची जीभ अशी सैल सुटण्याच्या या 'व्याख्यानमाले'चे पहिले पुष्प नाशिकमध्ये गुंफले गेले होते, हे अनेकांना ठाऊक नसावे. विधान परिषद निवडणुकीत धक्कादायक पराभव झाल्याने महायुतीचे नरेंद्र दराडे यांचे बंधू तथा आमदार किशोर दराडे यांनी विजयी उमेदवार गोकुळ गिते आणि त्यांना मदत करणाऱ्या मतदारांबद्दल (नगरसेवक) कोणतीही भिडभाड न बाळगता 'ऑन कॅमेरा' शिव्यांची लाखोली वाहिली. पक्षाची अनेक पदे, मानमरातब आणि आमदारकीसुद्धा भूषविलेल्या दराडे कुटुंबियांनी आधी प्रचारादरम्यानच विरोधकाच्या 'बापा'चा उद्धार केलाच होता, नंतर त्यांनी 'माय'सुद्धा काढली. त्यापुढे जात 'अठरा-वीस कोटी रुपये वाटल्यानंतरही आमच्यासोबत विश्वासघात झाला', असा आरोप करून ही निवडणूक नेमकी कशी लढली जाते, याचीही जाण जनतेला करून दिली. राज्यभर थू-थू झाल्यानंतर नार्वेकर आणि पाटील यांनी किमान दिलगिरी तरी व्यक्त करून या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. नाशिकच्या उमेदवाराला मात्र तेवढीही सुबुद्धी सुचली नाही किंवा नाशिककर काहीच बोलत नाही हे गृहीत धरल्याने त्यांना तशी गरज वाटली नसावी, असो. आता त्या-त्या पक्षांचे प्रमुख आपापल्या वाचाळ नेत्यांना किमानपक्षी तंबी देतील किंवा तसे केल्याचे भासवतील तरी. अलीकडच्या काळात असल्या गोष्टी महाराष्ट्राच्या अंगवळणी पडल्या आहेतच. 'वाईट ऐकू नका, वाईट बोलू नका' या महात्मा गांधी यांच्या शिकवणीचा भलताच अर्थ सामान्यांनी काढल्याने साराच आनंदीआनंद. अशा सुमार दर्जाच्या नेतेमंडळींचे त्यामुळेच फावते आहे. 'कोणी काही बोलले, लिहिले तरी आम्हाला फरक पडत नाही, आपले कोणीच काही वाकडे करू शकत नाही', अशा गुर्मीत ते वावरत असतात. यापुढेही वावरतीलच. विधान परिषदेची नाशिकची निवडणूक खऱ्या अर्थाने कमालीची चुरशीची ठरल्याचे उभ्या महाराष्ट्राने पाहिले. भाजपकडे विजयाचे संख्याबळ असूनही महायुतीत ही जागा शिंदे गटाला सुटल्याने आणि त्यातही दराडेंनी आधीच्या टर्ममध्ये विशेष कार्यकर्तृत्व दाखविले नसल्याने त्यांच्याविरोधातील नाराजी उफाळून आली. त्यामुळेच अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांना चाल मिळाली. मतदारांना गितेंच्या शब्दाबद्दल जेवढी खात्री वाटत होती, त्याच्या एक टक्काही विश्वास दराडेंवर उरला नव्हता. त्यामुळेच हक्काचे एकही मत नसताना आणि कोणत्याही पक्षाची उघड साथ नसताना गितेंनी बाजी मारली. खरे तर गितेंचे थोरले बंधू गणेश गिते यांचाच या जागेवर दावा होता. परंतु, भाजपचे सदस्य असल्याने आणि जागा शिंदे गटाकडे असल्याने या खेपेला त्यांची अडचण झाली. माघार घ्यावी लागली आणि नंतर 'मै नहीं तो भाई सही' हा 'प्लॅन बी' पुढे करण्यात आला. तो यशस्वी ठरला. तेल लावलेल्या पैलवानाप्रमाणे दराडेंचा पट काढून त्यांना चितपट केले गेले. पडद्याआड बरेच काही घडत असूनही प्रसारमाध्यमे, स्पर्धक उमेदवार आणि सामान्यांनाही त्याची भणक लागणार नाही, याची अचूक खबरदारी घेण्यात आली. राजकारणात यशस्वी व्हायचे तर अशी चाणक्यनीती वापरण्याशिवाय गत्यंतर नसते. संयम आणि काटेकोर रणनीतीद्वारे गिते बंधूंनी घरात आमदारकी आणण्याचे स्वप्न खरे केले. वास्तविक, उदय सामंत, गिरीश महाजन आणि दादा भुसे या तिन्ही मंत्र्यांनी ताकद लावून आणि खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जातीने लक्ष घालूनही गितेंनी माघार घेतली नाही. अर्थात, यापैकी महाजन नेमकी कोठे ताकद लावत होते, हे आता स्पष्ट झाले आहे.

स्वत: मुख्यमंत्र्यांनीही त्याबाबत मिश्किल टिप्पणी केल्याने त्यांना 'तो मी नव्हेच' असे म्हणण्याची सोय राहिलेली नाही. राजकारण ह्यालाच तर म्हणतात. दगाफटका होऊ शकतो याचा अंदाज आल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाशिकमधील घडामोडींकडे विशेष लक्ष ठेवून होते. त्यामुळेच निकाल लागल्यानंतर त्यांनी गितेंसाठी विशेष विमान पाठविण्याची चपळाई केली. निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत उमेदवाराचा पराभव होऊनही शेवटी शिंदेच जिंकले. स्वत: गोकुळ गिते यांचाही सुरुवातीपासूनच भाजपपेक्षा शिंदे सेनेकडे ओढा होता. त्याची कारणे स्पष्टच असून, आगामी राजकीय घडामोडींत ती दडलेली आहेत.

**– संपत थेटे**

# पेपरफुटी कधी थांबणार?

टीईटीचा पेपर फुटला आणि समाजमाध्यमांवर मीम्सचा अक्षरशः पाऊस पडू लागला. नीटचा पेपर म्हणजे मुलाचा पेपर फुटला; आता त्या मुलांचे बाप, जे शिक्षक म्हणून सेवेत आहेत आणि टीईटीची परीक्षा देत आहेत, त्यांचाही पेपर फुटला! अशा आशयाचे मीम्स समाजमाध्यमांवर लक्ष वेधून घेत होते. विनोद आणि विडंबनाच्या माध्यमातून समाजातील रोष व्यक्त करण्यासाठी मीम्स तयार केल्या जातात.

मागील रविवारी झालेल्या एमबीबीएस प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेला केवळ काही मिनिटांचा विलंब झाल्यामुळे एका शेतकरी वडिलांच्या मुलीला परीक्षेपासून वंचित राहावे लागले. त्या वडिलांचे अनावर दुःख व्यक्त करणारा व्हिडिओ सर्वत्र पाहायला मिळाला. केवळ काही मिनिटे उशीर झाल्यामुळे त्या विद्यार्थिनीला परीक्षा देता आली नाही आणि तिची वर्षभराची मेहनत वाया गेली. अशा वेळी परीक्षा केंद्रावरील अधिकाऱ्यांनी मानवतेच्या दृष्टीने विचार करणे अपेक्षित होते. पेपरफुटीसारख्या गंभीर चुका यंत्रणा पचवून टाकते; मात्र परीक्षार्थ्याकडून झालेल्या काही मिनिटांच्या विलंबासाठी त्याच्या संपूर्ण वर्षाचे नुकसान करणारी शिक्षा अन्यायकारक वाटते. नियम आणि कायदे कुठे कठोरपणे, तर कुठे लवचिकतेने लागू करावेत, याचा विवेक संबंधित अधिकाऱ्यांकडे असणे आवश्यक आहे. त्यांच्याकडे सद्सद्विवेकबुद्धी असेल, अशीच अपेक्षा समाजाची असते.

पेपरफुटीच्या घटनांमुळे एकूणच शिक्षण व्यवस्था चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. पूर्वी परीक्षा केंद्रांवर कॉपी करणाऱ्यांचा आणि कॉप्या पुरवणाऱ्यांचा सुळसुळाट होता. एखाद्या विद्यार्थ्याची कॉपी पकडल्यानंतर संबंधित पर्यवेक्षकाला मारहाण झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. खोटी गुणवत्ता मिळवण्यासाठी साम, दाम, दंड, भेद या सर्व उपायांचा वापर करणारे लोक पूर्वीही होते आणि आजही आहेत. कॉपी करून किंवा पेपर विकत घेऊन गुण मिळवणे, नोकऱ्या पटकावणे आणि खोटी गुणवत्ता सिद्ध करणे ही प्रवृत्ती आजही संपलेली नाही. असे लोक उजळ माथ्याने समाजात वावरताना दिसतात.

आपल्याकडे एक म्हण आहे, ओलंही जळतं आणि वाळलेलंही जळतं. परीक्षांमध्ये गैरप्रकार करून खोटी गुणवत्ता मिळवून नोकऱ्या मिळवणारे अनेक जण आज विविध पदांवर कार्यरत असतील. अशा व्यक्ती असंवेदनशील,




भ्रष्ट, कामचुकार आणि अनैतिक मार्गाचा अवलंब करणारे असतील यात शंका नाही...

लाखो विद्यार्थी ज्या परीक्षा देत आहेत, त्या परीक्षांची संपूर्ण यंत्रणा अत्यंत दक्षतेने आणि पारदर्शकपणे हाताळली गेली पाहिजे.वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या स्पर्धा परीक्षांचे पेपर जर वारंवार फुटत असतील, तर या परीक्षा पद्धतीचा गंभीरपणे पुनर्विचार होणे आवश्यक आहे. त्याऐवजी निबंधात्मक परीक्षा, ओपन बुक परीक्षा किंवा सातत्यपूर्ण मूल्यमापन अशा पर्यायी पद्धतींचा विचार केला जाऊ शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे सर्वांगीण मूल्यमापन अधिक प्रभावीपणे करता येईल.

शिक्षण व्यवस्थेतून समजदार, सुसंस्कृत, कौशल्यवान आणि जबाबदार पिढी घडली पाहिजे. केवळ तीन तासांच्या एका परीक्षेच्या आधारे एखाद्या विद्यार्थ्याला लायक किंवा नालायक ठरवणे योग्य ठरत नाही. नीट ही परीक्षा वैद्यकीय शिक्षणासाठी पात्रता ठरवते. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना दोन-तीन वर्षे अथक परिश्रम घ्यावे लागतात. संकल्पना समजून घेणे, त्या दृढ करण्यासाठी सातत्याने अभ्यास करणे आणि स्मरणशक्तीच्या आधारे परीक्षा देणे, हा या प्रक्रियेचा भाग असतो. मात्र अशी परीक्षा विद्यार्थ्याच्या सर्वांगीण गुणवत्तेचे खरोखरच अचूक मूल्यमापन करू शकते का, याचाही वेळोवेळी विचार होणे आवश्यक आहे.

टीईटी ही परीक्षा शिक्षक होण्यासाठीची पात्रता परीक्षा आहे. परंतु ही परीक्षा मुख्यतः माहितीवर आधारित आहे. प्रत्यक्ष वर्गात प्रभावी अध्यापन करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये तीन तासांच्या लेखी परीक्षेतून पूर्णपणे तपासता येत नाहीत. त्यामुळे कोणत्याही मार्गाने जास्त गुण मिळवून जो जीता वही सिकंदर होण्याचा प्रयत्न पूर्वीही झाला आहे आणि पुढेही होत राहण्याची शक्यता आहे.

पेपरफुटीनंतर परीक्षा रद्द करून पुनर्परीक्षा घेण्यात येते. त्यामुळे प्रामाणिक आणि कष्टाळू विद्यार्थ्यांवरील अन्याय काही प्रमाणात दूर होतो. मात्र वारंवार पेपरफुटी आणि पुनर्परीक्षांच्या घटना घडत राहिल्या, तर शिक्षण व्यवस्थेवरील विद्यार्थ्यांचा आणि समाजाचा विश्वास कमी होत जाईल. म्हणूनच पेपरफुटीचे हे दुष्टचक्र आता कायमचे थांबले पाहिजे.

**– किशोर जाधव,सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

# वटपौर्णिमा-पर्यावरण संवर्धन व कुटुंबमूल्ये जपणारा सण

वटपौर्णिमा हा सण सामान्यतः हिंदू दिनदर्शिकेच्या ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमेला साजरा केला जातो.या जेष्ठ महिन्यात पावसाची चाहूल लागलेली असते.ढग दाटून आलेले असतात.गावाकडे शेतातील कामांनी जोर धरलेला असतो.मात्र शेतीतील कामे सांभाळून स्त्री पुरुष पारंपरिक पद्धतीने सण साजरे करतात.प्रमुख सणापैकी वटपौर्णिमा हा महिलांसाठी मुख्य सण आहे. साधारण दोन ते तीन दशकाअगोदर सण साजरे करण्यामागील परिस्थिती सध्याच्या काळापेक्षा वेगळी होती. तेव्हा सण अगदी साध्या पद्धतीने जरी साजरे होत असले तरी,मात्र संस्कृतीला धरून व सामाजिक भान ठेवून साजरे केल्या जायचे.सण साजरे करण्यामागे काही ऐतिहासिक पार्श्वभूमी अथवा कारण असते.व ते का साजरे करावेत त्यातून काय शिकवण आपण या पिढीतील लोकांनी घ्यावी हे सुद्धा महत्वाचे असते. हे समजून घायला मनात शुद्ध भाव हवा त्याचबरोबर चिकित्सक दृष्टिकोन सुद्धा हवा.सत्य काय असत्य काय याची जाणीव असायला हवी. अंधश्रद्धा, बुरसटलेल्यारूढी परंपरा याला थारा नसावा.सण साजरे करायचे म्हणून करायचे केवळ ही भावना मनात न ठेवता वैज्ञानिक दृष्टीकोन लक्षात घेऊन चिकित्स्क दृष्टीने साजरे करावेत.

पौराणिक कथेनुसार,वटपौर्णिमा या सणाविषयी सारांश रूपाने सांगायचे झाल्यास, सावित्री ही राजकन्या आणि सत्यवान हा वनवासी राजपुत्र. सत्यवान अल्पायुषी असल्याचे माहित असूनही सावित्रीने त्याच्याशी विवाह केला. नियोजित दिवशी सत्यवानाचा मृत्यू झाला तेव्हा यमराज त्याचे प्राण घेऊन निघाले. सावित्रीने आपल्या बुद्धिमत्ता, संयम आणि निष्ठेच्या बळावर यमराजांकडून अनेक वर मिळवले आणि शेवटी सत्यवानाचे प्राणही परत मिळवले.त्यामुळे सावित्री ही धैर्य, निष्ठा आणि दृढ संकल्पाचे प्रतीक मानली जाते. त्याचबरोबर निसर्गातील वृक्षरुपी देवतेचे दर्शन घडते.वृक्षसंवर्धनाचा संदेश देण्याची शिकवण या वटपौर्णिमेच्या माध्यमातून आपल्याला मिळतो,कारण या सृष्टीतील अनेक घटकांचे आपण ऋणी आहोत.वास्तविक बघता मानव म्हणून निसर्गासाठी काय करतो. याउलट आपणच अनेक गोष्टींचा उपभोग घेतो व त्याबदल्यात आपण काय देतो.मानवाच्या वाढत्या अपेक्षा व हव्यासापायी याच सृष्टीतील अनेक घटकांचा नाश मानव प्राणी करत आहे. म्हणून एक उपकाराची परतफेड या दृष्टकोनातून,या सणाच्या निमित्ताने पूजन करणे गरजेचे आहे.कारण वडाचे झाड दीर्घायुष्य,स्थैर्य आणि अखंड जीवनाचे प्रतीक आहे.भारतीय परंपरेनुसार वडामध्ये ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे प्रतीकात्मक वास्तव्य मानले जाते.वडाचे झाड भरपूर प्राणवायू निर्माण करण्यास,सावली देण्यास आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावते.या ठिकाणी धार्मिक दृष्टीकोण, श्रद्धेचा भाग व भारतीय परंपरा म्हणून पतीच्या दीर्घायुष्यासाठी व्रत केल्यास त्यातून



पती-पत्नीतील परस्पर विश्वास,समानता, आदर आणि आयुष्यभराची साथ यांचा उत्सव म्हणूनही साजरा केल्यास हा एक भावनिक बंध ठरेल.आजच्या काळासाठी हे सर्व गरजेचे आहे.कारण बदलती व औपचारिक जीवनशैली नात्यातील कटुभाव दूर सारून कुटुंबव्यवस्था अबाधित राहण्यास मदत होइल.

मागील काहीवर्षी समाजमाध्यमावर केवळ प्रसिद्धीसाठी मानवी स्वभावातील विकृतपणा दिसून आला.काही पुरुषांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून,पुढील जन्मी ही पत्नी नको म्हणून टवाळखोर पुरुषांनी वडाच्या झाडाला दोरा बांधून गाणे लावून डान्स केला व समाजमाध्यमावर प्रसार केले.नेमकं त्यांना काय सिद्ध करायचं? कशासाठी हे कृत्य? सणामागील मुख्य हेतू शिकवण संदेश बाजूला ठेवून हे दुष्कृत्य कशासाठी?कुटुंबातील एकोपा अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न करायला हवे की,असे दुषकृत्य करुन समाजामध्ये वातावरण दूषित करायचं यावर चिंतन करायला हवं.व समाजामध्ये सणाचा सकारात्मक संदेश लोकांपर्यंत पोहचायला हवा. दुसरे असे की,काही महिलांनी झाडाच्या फांदया तोडून आणून त्याची घरी पूजा केली. या कृत्यातून या पवित्र सणानिमित्त केलेली वृक्षतोड योग्य आहे का? याउलट हा सण निसर्गातील वृक्षदेवतेची पूजा व वृक्षसंवर्धनाची शिकवण देतो. अश्या या कृत्यातून आजच्या पिढीतील मानवाने त्याच्या या विकृत स्वभावाने सणांचा मुख्य हेतू,शिकवण कुठे नेऊन ठेवलीय.येणाऱ्या पिढीसाठी आपण काय आदर्श ठेवणार? म्हणून, या पिढीतील जागरूक युवक युवतींनो, मूळ धर्मग्रंथाचे वाचन करा.सण साजरे करण्यामागील मूळ उद्देश लक्षात घ्या.पवित्र सणांचे पावित्र्य कायम ठेवा.

आपले पुर्वज व पुराण आपल्याला वैज्ञानिक दृष्टीकोणाची शिकवण देतात.मूर्तीपूजेबरोबर निसर्गातील हे सजीव घटक की जे आपल्या दैनंदिन जीवनात उपयोगाचे आहे. जसं की, वटपौर्णिमेच्या निमित्ताने पूजल्या जाणारे वटवृक्ष हे मोठ्या आकाराचे आणि दीर्घायुषी झाड आहे.ते मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड शोषून पर्यावरण संतुलनास मदत करते.त्याची दाट सावली परिसरातील तापमान कमी करण्यास हातभार लावते.पक्षी, खारी, कीटक आणि इतर अनेक जीवांसाठी ते निवारा व अन्नाचा स्रोत असते.जमिनीची धूप कमी होण्यास मदत करते.

अश्याप्रकारे आजच्या या काळात संस्कृती व परंपरेबरोबरच्या जपवणुकीबरोबर सर्व माता भगिनींनी एकत्रित येऊन पर्यावरणाचे संवर्धन कसे करता येईल याविषयी चर्चासत्र आयोजित करायला हवे.एक वडाचे किंवा इतर स्थानिक वृक्षाचे रोप लावणे आणि त्याचे संगोपन करणे.पर्यावरण संवर्धन कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेणे.अन हो ! महिला ज्याप्रमाणे पतीच्या दीर्घायुष्यासाठी व्रत करतात त्याप्रमाणे पुरुषांनी सुद्धा दांपत्यातील परस्पर आदर,विश्वास आणि सहजीवनाची भावना दृढ करण्यासाठी वरील उपक्रमामध्ये सहभागी व्हायला हवे. जेणेकरून वटपौर्णिमा हा सण श्रद्धा,पर्यावरण संवर्धन, कुटुंबमूल्ये आणि निसर्गाशी असलेले नाते जपणारा सण म्हणून अधिक व्यापकदृष्टीने साजरा होइल.

**समस्त माता भगिनींना**
**वटपौर्णिमेच्या शुभेच्छा...!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

### वट पौर्णिमा

दिवस भलता खास
वटपौर्णिमा उपवास
बायकोचा पूजापाठ
खाल्लानाही रे घास

सांस्कृतिक वेशभुषा
प्रत्यक्ष सावित्रीभास
मीच सत्यवान नाही
निथळू जातो प्रभास

स सखी वटपूजनास
ललनांचा हा उल्हास
निमित्ते होई गाठभेट
मिळे निसर्ग सहवास

शुचिर्भूत निरामयरुप
गं सजवले परिसरास
वृक्ष वल्ली देवासमान
ताडण न करी वृक्षास

वृक्षा रोपण करी नारी
दे हातभार संवर्धनांस
जाणे संस्कृतीभुमिका
गं फुलवी राना वनास

कळे सत्य कलियुगास
मरण न चुकलेकुणास
स्वास्थ्यपूर्ण हे आयुष्य
मिळो वाव सद् गुणांस

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# पेपर फुटी... विद्यार्थी व सरकारचे नुकसान...

नुकताच टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्याची बातमी समोर आली. त्या अगोदर नीट परीक्षेचा सुद्धा पेपर फुटलेला होता.

नीट परीक्षेसाठी सुमारे २२ लाखावर विद्यार्थी परीक्षेस बसले होते त्यांना पुन्हा पेपर द्यावा लागला आता टीईटी परीक्षा सुद्धा परत घेतली जाणार असून त्याची तारीख लवकरच जाहीर होईल टीईटी परीक्षेसाठी सुमारे चार लाखावर उमेदवार होते पेपर सेट करणे, तो केंद्राप्रमाणे पाठविणे, सुपरवायझरची नेमणूक, एकूणच व्यवस्थापन या साठी सरकारचे लाखो रुपये खर्च होतात. या शिवाय पेपर फुटीमुळे विद्यार्थ्यांचे सुद्धा नुकसान होते. त्यांना केंद्राप्रमाणे पुन्हा परीक्षेसाठी जावे लागते. नेटाने अभ्यास करूनही परीक्षा रद्द झाल्यास अनेक विद्यार्थी निराश होतात. यात हुशार व मेहनती विद्यर्थ्यांना जास्त त्रास होतो.

या शिवाय वेळेचा अपव्यय होतो सर्व वेळापत्रक पुढे जातेएवढ्या मोठ्या संख्येने विध्यार्थी ज्या परीक्षेला बसतात त्या परीक्षेला तसेच परीक्षा घेण्याच्या पद्धतीला अत्यंत महत्व द्यावयास पाहिजे सुमारे चार पाच दशकांपूर्वी पपेरफुटीचे प्रकार होत नसत गोपनीयता हा महत्वाचा घटक अतिशय जपला जात असे हल्ली मोबाईल, इ मेल, इंस्ट्राग्राम इत्यादी साधने आहेत त्यामुळे पेपर फुटीचे लोन त्वरित पसरते त्यामुळे परीक्षांचे नियोजन अतिशय अभ्यासपूर्वक करणे आवश्यक आहे. सरकारला सुद्धा पुन्हा परीक्षा घेण्यामुळे आर्थिक नुकसान होते.

यासाठी सरकारने अशा मोठ्या परीक्षा कशा आयोजित कराव्यात याचे नियम बनविले पाहिजेत यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावयास काही हरकत नाही परीक्षा पद्धतीवर विद्यार्थी, पालक यांचा विश्वास बसला पाहिजे सरकारने यात लक्ष घालण्याची वेळे आता आली आहे हेच खरे आहे.

**– शांताराम वाघ, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात

### जावळी अंगणवाडीत राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम उत्साहात



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२८, पेण (रायगड) :** रविवारी, दि.२८ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत पेण तालुक्यातील जावळी येथील अंगणवाडीत ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्यात आला. पोलिओमुक्त भारताचे उद्दिष्ट समोर ठेवून राबविण्यात आलेल्या या मोहिमेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मोहिमेदरम्यान अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका आणि आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजून लसीकरण केले. तसेच पालकांना नियमित लसीकरणाचे महत्त्व, पोलिओ प्रतिबंधासाठी वेळेवर डोस देण्याची आवश्यकता आणि प्रत्येक पात्र बालकापर्यंत लसीकरण पोहोचविण्याबाबत जनजागृती करण्यात आली.

५ वर्षांखालील एकही बालक पोलिओच्या डोसपासून वंचित राहू नये, या उद्देशाने दिवसभर लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमुळे बालकांचे पोलिओसारख्या गंभीर आजारापासून संरक्षण होण्यास मदत होत असून, पालकांनीही या उपक्रमाला सक्रिय सहकार्य केले. जावळी परिसरातील सर्व पात्र बालकांचे लसीकरण करण्यासाठी आरोग्य विभाग आणि महिला व बालविकास विभागाने समन्वयाने काम करत ही मोहीम यशस्वीरीत्या पार पाडली.

### पालम ग्रामीण रुग्णालयात पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२८, पालम (परभणी) :** राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेतंर्गत रविवारी, दि.२८ जून रोजी पालम येथील ग्रामीण रुग्णालय, पालम येथे ० ते ५ वर्ष वयोगटातील बालकांसाठी पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेला पालम शहर व परिसरातील पालकांकडून अतिशय उत्तम आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद रोकडे, रुग्ण कल्याण समितीचे अध्यक्ष उबेदुल्ला खान पठाण यांच्या प्रमुख उपस्थितीत बालकांना पोलिओचे डोस पाजून मोहिमेचा यशस्वी शुभारंभ करण्यात आला. लसीकरण केंद्रावर येणाऱ्या लहान चिमुरड्यांचा उत्साह वाढवण्यासाठी आणि पालकांचे आभार मानण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांकडून बालकांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ विशेष लसीकरण बूथ तयार करण्यात आला होता, जिथे दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय कायम असे जनजागृती करणारे बॅनर्स लावण्यात आले होते.

या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि रुग्णालयातील इतर सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलिओ निर्मूलनासाठी प्रत्येक पालकाने आपल्या ५ वर्षांखालील बालकाला डोस पाजणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे, असे आवाहन यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद रोकडे व उपस्थित मान्यवरांनी केले. शहरतील पालकांनीही प्रतिसाद देत, आपल्या मुलांना पोलिओ संरक्षणाचे कवच दिले.

### बोरी ग्रामीण रुग्णालयात पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ



**अक्षराज : जफर शेख**

**दि.२८, बोरी (परभणी) :** रविवार, दि. २८ जून रोजी ग्रामीण रुग्णालय, बोरी येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस पाजण्यात आली. या मोहिमेचा शुभारंभ माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अजय चौधरी यांच्या हस्ते एका बालकाला पोलिओचे दोन थेंब पाजून करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्या दीपालीताई चौधरी, अश्विनताई चौधरी, सरपंच निर्मलाताई चौधरी , वैद्यकीय अधिकारी डॉ.पठाण, डॉ.गबाळे, साबळे सिस्टर, प्रभारी जे.डी. बकान, श्रीनिवास कंटे आशा सेविका मीना कवळे, सिंधू गाडे तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पालकांना आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले. मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### मद्यधुंद चालकामुळे बालाजी वेफर्सचा ट्रक पलटी; सुदैवाने जीवितहानी टळली



**अक्षराज : जफर शेख**

**दि.२८, बोरी (परभणी) :** परभणी जिंतूर महामार्गावरील बोरी येथील राष्ट्रमाता जिजाऊ उद्यानालगत दिनांक २७ जून रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास बालाजी वेफर्स कंपनीचा मालवाहतूक ट्रक (क्र. MH-04 JK-7462) पलटी झाल्याची घटना घडली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक परभणी हुन जिंतूर कळेच्या दिशेने जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक रस्त्याच्या कडेला पलटी झाला. अपघाताच्या ठिकाणालगत हॉटेल असून त्या वेळी अनेक नागरिक चहा-नाश्त्यासाठी बसले होते. मात्र, रस्त्याच्या कडेला असलेल्या मातीच्या ढिगाऱ्यामुळे ट्रकचा वेग कमी झाला आणि तो हॉटेलपर्यंत न पोहोचता पलटी झाल्याने मोठा अनर्थ टळला. अन्यथा मोठी जीवितहानी होण्याची शक्यता स्थानिकांनी व्यक्त केली. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ट्रक चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत होता. घटनेची माहिती मिळताच बोरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी चालकाला ताब्यात घेत अटक केली असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. चालक मद्यधुंद होता की नाही, याबाबतचा अंतिम निष्कर्ष वैद्यकीय तपासणी व पोलिस तपासानंतर स्पष्ट होणार आहे. या अपघातामुळे काही काळ जिंतूर-परभणी महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिस व स्थानिक नागरिकांच्या मदतीने वाहतूक सुरळीत करण्यात आली. स्थानिकांचे म्हणणे आहे की वारंवार या महामार्गांवर अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अति वेगाने लोकं या ठिकाणी वाहने चालवत आहेत. प्रशासनाने वेग नियंत्रणासाठी काहीतरी उपाय योजना कराव्यात, असे नागरिकांकडून बोलले जात आहे.

# आण्णा हजारेंनी थोपटली मुंडेंची पाठ



## अशा डॅशिंग अधिकाऱ्याची देशाला गरज

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** अन्न व औषध प्रशासनचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या अन्न भेसळविरोधी मोहिमेचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी कौतुक केले आहे. तुकाराम मुंडे यांच्यासारखे समाजहितासाठी काम करणारे अधिकारी देशात मोठ्या प्रमाणात निर्माण झाले पाहिजेत. अशा अधिकाऱ्यांचा गुणाकार झाला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. समाज आणि प्रशासनात अधिकाधिक प्रामाणिक व धाडसी अधिकारी तयार होण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

समाजहितासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे अण्णा हजारे हे केवळ शासनाच्या चुकीच्या धोरणांवर टीका करत नाहीत, तर चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे खुलेपणाने कौतुकही करतात. सध्या राज्यभर सुरू असलेल्या भेसळविरोधी कारवाईत पुढाकार घेणारे अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या कार्याची त्यांनी विशेष दखल घेतली.

हजारे यांनी केवळ मुंडे यांच्या मोहिमेचे समर्थनच केले नाही, तर अशा अधिकाऱ्यांची संख्या वाढणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. समाजाच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांवर कठोर भूमिका घेणाऱ्या अधिकाऱ्यांना जनतेचा पाठिंबा मिळायला हवा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अण्णा हजारे स्वतः ही समाजहिताच्या नव्या उपक्रमात सक्रिय झाले आहेत. वयाच्या ९०व्या वर्षी त्यांनी 'ना नफा – ना तोटा' या तत्त्वावर लाकडी घाण्यातून तयार होणाऱ्या भेसळमुक्त खाद्यतेल उत्पादनाचा उपक्रम सुरू केला आहे. सूर्यफूल, करडई, तीळ आणि खोबरेल तेल थेट ग्राहकांपर्यंत शुद्ध स्वरूपात पोहोचवण्याचा त्यांचा संकल्प आहे.

रिफाइंड आणि भेसळयुक्त तेलांच्या वाढत्या वापरामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन, नागरिकांना नैसर्गिक आणि विश्वासार्ह पर्याय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. अण्णा हजारे यांचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, निरोगी आणि भेसळयुक्त समाज घडवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. देशाला आदर्श गाव संकल्पना देणारे आणि भ्रष्टाचारविरोधी लढ्यात अग्रस्थानी राहिलेले अण्णा हजारे आता निरोगी समाजासाठी नवा आदर्श निर्माण करत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# खासदार लंके शिवसेनेत आल्यास स्वागतच; आमची दारे कायम खुली - संजीव भोर




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, अहिल्यानगर :** अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांच्या संभाव्य शिवसेना प्रवेशाच्या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले असून, शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते संजीव भोर यांनी यासंदर्भात मोठे विधान केले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी, निलेश लंके हे मूळचे शिवसैनिक आहेत. त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला तर त्यांचे आम्ही निश्चित स्वागत करू असे स्पष्ट केले.

आजच्या राजकारणात कोणताही नेता आयुष्यभर एकाच पक्षात राहील असे चित्र उरलेले नाही राजकारणात संपर्क आणि संवाद कायम सुरू असतो, असे सांगताना भोर म्हणाले की, सर्वच पक्षांचे नेते आणि पदाधिकारी एकमेकांच्या संपर्कात असतात. काही जण शेवटपर्यंत ठाम भूमिका घेतात, तर काहींच्या राजकीय हालचाली आणि चर्चा सुरू असतात. त्यामुळे कोण कोणत्या पक्षात जाईल याबाबत आधीच निश्चितपणे सांगता येत नाही. आजच्या राजकारणात कोणताही नेता आयुष्यभर एकाच पक्षात राहील असे चित्र उरलेले नाही. हीच सध्याची राजकीय वास्तवता आहे, असेही त्यांनी पत्रकार परिषदेमध्ये स्पष्ट सांगितले.

### निलेश लंके हे मूळचे शिवसैनिक

खासदार निलेश लंके हे मूळचे शिवसैनिक, पक्षात आले तर आम्ही नक्कीच त्यांचा स्वागत करू. खासदार निलेश लंके यांच्याबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, लंके हे पूर्वीपासून शिवसेनेशी जोडलेले असून त्यांचे अनेक शिवसेना नेत्यांशी जुने संबंध आहेत. पक्ष वेगळे असले तरी वैयक्तिक संपर्क कधीच तुटत नसतात. शिवसेना शिंदे गटाची भूमिका स्पष्ट करताना भोर म्हणाले, शिवसेनेत येऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक इच्छुकांचे आम्ही शंभर टक्के स्वागत करू. मग ते शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीतून असोत, काँग्रेसमधून असोत. आमची दारे सर्वांसाठी खुली आहेत. कारण ते सर्व आमचीच माणसे आहेत, संजीव भोर यांच्या या वक्तव्यामुळे अहिल्यानगरच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना सुरूवात झाली असून आगामी काळात खासदार निलेश लंके यांच्या राजकीय भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, हा आमचा संकल्प - आ. जोरगेवार




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या दारात दर्जेदार व मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य असून, कोणताही नागरिक केवळ आर्थिक अडचणीमुळे उपचारापासून वंचित राहू नये, यासाठी अशा आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्याचे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले. आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर महानगर तसेच आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे), सामान्य रुग्णालय चंद्रपूर आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज रविवारी घुग्घुस येथे भाजप कार्यालयात भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी घुग्घुस शहर अध्यक्ष संजय तिवारी, महामंत्री विवेक बोढे, सविता दंढारे, नामदेव डाहुले, वंदना हातगावकर, डॉ. तुषार ठाकरे, विनोद खेवले, महिला अध्यक्ष सुचिता लुटे, संतोष नुने, चिन्ना नलभोगा, गटनेता मीना मोरपाका, पूजा दुर्गम, नगरसेविका वैशाली ढवस, नगरसेवक गणेश पिंपळकर, प्रेमलाल पारधी, रामपाल वर्मा, संजय भोंगळे, राजकुमार गोडशेलवार आदींची उपस्थिती होती. यावेळी आ.जोरगेवार म्हणाले की, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. आज अनेक नागरिक आर्थिक अडचणींमुळे योग्य वेळी उपचार घेऊ शकत नाहीत. त्यामुळे गंभीर आजार बळावतात. अशा परिस्थितीत तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून मोफत तपासणी, निदान आणि आवश्यक शस्त्रक्रियांची सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रत्येक नागरिकाला उत्तम आरोग्यसेवा मिळाली पाहिजे, हीच आमची भूमिका आहे. ते पुढे म्हणाले की, या शिबिरात मेडिसीन, नेत्ररोग, शल्यचिकित्सा, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, त्वचारोग तसेच कान-नाक-घसा आदी विविध विभागातील तज्ज्ञ डॉक्टर नागरिकांची तपासणी करणार आहेत. गरज भासल्यास पुढील उपचार, शस्त्रक्रिया आणि शासनाच्या विविध आरोग्य योजनांचाही लाभ रुग्णांना मिळवून दिला जाईल. यावेळी त्यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले. रुग्णांची केवळ तपासणी करून थांबणार नाही, तर आवश्यक ते उपचार, शस्त्रक्रिया आणि शासनाच्या योजनांचा लाभही मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जनतेचे आरोग्य हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे, असेही आ. किशोर जोरगेवार यांनी स्पष्ट केले. या शिबिरामध्ये हर्निया, हायड्रोसिल, पोटातील गाठी, गर्भाशयाच्या शस्त्रक्रिया, मोतीबिंदू तसेच इतर विविध शस्त्रक्रियांसाठी पात्र रुग्णांची निवड करण्यात येणार असून कर्करोग निदान व संदर्भ सेवा, जन्मजात व्यंगांवरील शस्त्रक्रिया तसेच विविध आजारांचे निदान व उपचाराची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# आषाढी वारीत स्वागत कमानी उभारल्यास काँग्रेस हटवणार; मुख्यमंत्री फडणवीसांना कौलगे पाटलांचा इशारा



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२८, पंढरपूर :** आषाढी पालखी सोहळ्याच्या मार्गावर स्वागत कमानी उभारण्यात आल्यास त्या काँग्रेस कार्यकर्त्यांकडून हटविण्यात येतील, असा इशारा किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल कौलगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे. मुख्यमंत्र्यांना ई-मेलद्वारे पाठविलेल्या निवेदनात कौलगे पाटील यांनी म्हटले आहे की, आषाढी वारीला शेकडो वर्षांची परंपरा आहे. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, स्वर्गीय वसंतदादा पाटील, शरद पवार, स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्यासह आजवरच्या कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी वारीच्या काळात स्वतःच्या प्रसिद्धीसाठी पालखी मार्गावर स्वागत कमानी उभारल्या नाहीत. उलट वारकरी व भाविकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला. मात्र, गेल्या वर्षापासून भाजप सरकारच्या काळात ग्रामविकास विभागामार्फत पालखी प्रस्थानापासून पंढरपूरपर्यंत प्रत्येक गावात स्वागत कमानी उभारण्यात आल्या. या कमानींवर केवळ भाजप नेत्यांची छायाचित्रे असून त्यामुळे गावांची ओळख आणि ऐतिहासिक वैशिष्ट्ये झाकोळली गेली. तसेच, मागील वर्षी पालखी मुक्कामाची गावे आणि विसाव्याची ठिकाणे ओळखण्यात भाविक, नागरिक तसेच पोलीस प्रशासनाला अडचणी आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

### कमानींमुळे वारकऱ्यांना अडथळा

स्वागत कमानींमुळे वारकऱ्यांच्या मार्गात अडथळे निर्माण होतात. तसेच कायदा व सुव्यवस्था राखताना पोलीस प्रशासनालाही अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे यंदा कोणत्याही प्रकारच्या स्वागत कमानी उभारू नयेत, अशी मागणी कौलगे पाटील यांनी केली आहे.

### निविदांवरही उपस्थित केले प्रश्न

वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सर्व निविदा सोलापूर जिल्हा परिषदेमार्फत काढण्यात आल्याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यांसाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया अपेक्षित असताना सर्व निविदा सोलापूर जिल्हा परिषदेमार्फत काढण्यात आल्याने त्यामागील हेतू संशयास्पद असल्याचा आरोप त्यांनी केला. सोलापूर जिल्हा परिषद भ्रष्टाचाराचे केंद्र बनत असून अधिकाऱ्यांसाठी पैसे खाण्याचे कुरण तयार होत असल्याचाही गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

### कायमस्वरूपी सुविधांची मागणी

दरवर्षी जर्मन हँगर शेडच्या भाड्यावर कोट्यवधी रुपये खर्च करण्याऐवजी पालखी मार्गावर कायमस्वरूपी रस्ते, पत्राशेड, उंच पाण्याच्या टाक्या, स्वच्छतागृहे आणि इतर मूलभूत सुविधा उभाराव्यात. त्यामुळे शासनाचा अनावश्यक खर्च वाचेल आणि वारकऱ्यांनाही दीर्घकालीन सुविधा मिळतील, असे आवाहन त्यांनी केले आहे. या निवेदनाच्या प्रती माजी विधानसभा अध्यक्ष नाना पटोले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनाही पाठविण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# यंदाच्या वर्षी दुष्काळ की अतिवृष्टी; शेतकऱ्यांमध्ये संभ्रम

## मान्सूनची पुन्हा 'तारीख पे तारीख' पेरण्या पडल्या लांबणीवर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये मागील वर्षीच्या तुलनेमध्ये यावर्षी मान्सून लांबल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली असून अनेक हवामान तज्ञांनी आजपर्यंत दिलेल्या हवामान अंदाज फोल ठरत असल्याचे चित्र आहे. अनेक हवामान तज्ञांच्या मते यावर्षी पाऊस हा सरासरीपेक्षा कमी जरी असला तरी तो अति कमी नाही सरासरी मध्ये ९२ ते ९३ टक्के पाऊस होईल असा अंदाज हवामान तज्ञ देत आहेत. तर काही तज्ञांच्या मते अति पाऊस होण्याचा अंदाज सांगितला जात असल्याने शेतकरी संभ्रमात पडले आहेत.



जून महिन्याच्या सुरुवातीलाच मान्सून लांबल्यामुळेच पावसाची मोठी तूट निर्माण झाली असून शेतकरी सध्या संभ्रमात आहेत. मान्सून लांबणीवर व पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे शेतकऱ्यांवर सध्या तरी दुष्काळाचे सावट मिरवत आहे. जूनच्या शेवटच्या पंधरवड्यात महाराष्ट्रात सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस झाला आहे. म्हणजे तब्बल ७४ ते ७५ टक्के पावसाची तूट नोंदवली गेलेली आहे.

सध्या मान्सूनची संथ गती असून ८ जून रोजी मान्सूनच्या महाराष्ट्राच्या काही भागात प्रवेश केला खरा पण त्यानंतर वेस्टर्ली जेट स्ट्रीम च्या प्रभावामुळे मान्सूनची प्रगती थांबली आहे. मुंबई आणि उर्वरित भागात मान्सून आता २८ जून च्या आसपास सक्रिय होईल असा अंदाज आयएमडीने वर्तवला आहे. हवामान तज्ञांच्या मते प्रशांत महासागरामध्ये एल निनो ची स्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे मान्सून कमकुवत होतो. आय एम डी च्या अंदाजानुसार यावर्षी एकूण सरासरी पावसाची ९० ते ९४ इतकी राहण्याची शक्यता आहे.

या परिस्थितीमुळे यंदा दुष्काळाची ३० ते ३५ टक्के शक्यता वर्तवण्यात आली असून ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात पावसाचे प्रमाण खूप घटू शकते असा अंदाज वर्तविला जात आहे. पारनेर तालुक्यासह जिल्ह्यामध्ये अनेक भागात सुरुवातीला पडलेल्या किरकोळ व पूर्व मोसमी पावसावर विश्वास ठेवून पेरणी करावी की नाही,असा संभ्रम शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला आहे. सद्यस्थिती पाहता पेरणीची योग्य वेळ येण्यासाठी अजूनही वाट पहावी लागेल. शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, किमान ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी,असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

**"सोशल मीडियावर आलेल्या हवामान तज्ञांचा उत हा शेतकऱ्यांना संभ्रमावस्था निर्माण करणारा ठरत आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार २६ ते ३० जून पासून राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. तर २६ ते ३० जून विदर्भ मराठवाडा आणि अहिल्यानगर तसेच उत्तर पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढेल तर १० जुलै ते १५ जुलै या काळात राज्यामध्ये तुफान आणि मुसळधार पाऊस होईल असा अंदाज व्यक्त केला आहे."**

# थोडक्यात

## प्रा.आ.केंद्र सावरमाळ येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात आली



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२८, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र सावरमाळ येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियान २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. बालकांना पोलिओमुक्त व निरोगी भविष्य देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या अभियानास ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास सावरमाळ गावचे मान्यवर नेते व युवा नेते बबन पाटील गोजेगावकर, प्राथमिक आरोग्य केंद्र सावरमाळचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शेखरकुमार सोनटक्के, गावातील प्रतिष्ठित नागरिक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थित पालकांनी आपल्या बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देऊन अभियानाला सक्रिय पाठिंबा दर्शविला.

यावेळी मार्गदर्शन करताना वैद्यकीय अधिकारी डॉ. शेखरकुमार सोनटक्के यांनी सांगितले की, पोलिओ हा कायमस्वरूपी अपंगत्व निर्माण करणारा आजार असून त्यापासून संरक्षणासाठी प्रत्येक बालकाला प्रत्येक वेळी पोलिओचे दोन थेंब देणे अत्यंत आवश्यक आहे. नियमित लसीकरण झालेले असले तरीही राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियानांतर्गत पोलिओचे दोन थेंब देणे गरजेचे आहे. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी सर्व पालकांनी आरोग्य विभागाला सहकार्य करावे. या अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र सावरमाळ कार्यक्षेत्रातील सर्व उपकेंद्रे, गावांतील बूथद्वारे ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण १,६४९ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात आले असून, कोणतेही पात्र बालक वंचित राहणार नाही यासाठी प्रा.आ.केंद्र, सावरमाळ येथील आरोग्य पथकामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभत असून, सर्व पालकांनी आपल्या परिसरातील पोलिओ बूथवर किंवा आरोग्य कर्मचाऱ्यांच्या भेटीदरम्यान आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले.

# पेणच्या शेतकऱ्यांची राज्यभर दखल; 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार' जाहीर

## पेणच्या दोन शेतकऱ्यांना राज्यस्तरीय शेतीनिष्ठ पुरस्कार

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२८, पेण (रायगड) :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार-२०२४' पेण तालुक्यातील दोन प्रगतशील शेतकऱ्यांना जाहीर झाला आहे. सर्वसाधारण गटातून मसद-बेडी येथील हरिश्चंद्र वसंत पाटील, तर आदिवासी गटातून वरसई विभागातील राजदांड-ढवराळ येथील प्रगतशील शेतकरी दामू मधू मधे यांची निवड झाली आहे. या पुरस्कारांचे वितरण १ जुलै २०२६ रोजी मुंबई येथील वरळी येथे राज्यपालांच्या हस्ते होणार असून, या दुहेरी यशामुळे पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्याच्या कृषी क्षेत्राचा गौरव वाढला आहे.

हरिश्चंद्र वसंत पाटील यांनी खाऱ्या व दलदलीच्या जमिनीत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शेतीत उल्लेखनीय परिवर्तन घडवून आणले आहे. एसआरटी पद्धतीने भात लागवड, शेततळे, मत्स्यपालन, पीक विविधीकरण तसेच भाजीपाला व सूर्यफूल लागवडीद्वारे त्यांनी शेतीला व्यावसायिक स्वरूप दिले आहे. त्यांच्या कार्यातून परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा स्वीकार केला असून सहकार क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. आदिवासी गटातील पुरस्कार विजेते दामू मधू मधे यांनी भाजीपाला उत्पादन व कुक्कुटपालनाच्या माध्यमातून शाश्वत आणि बाजाराभिमुख शेतीचा आदर्श निर्माण केला आहे. सुमारे १.७० हेक्टर क्षेत्रावर विविध भाजीपाला पिकांचे वर्षभर उत्पादन घेऊन त्याची थेट पेण व खोपोली बाजारपेठेत विक्री करून अधिक उत्पन्न मिळविण्याचा यशस्वी प्रयोग त्यांनी केला आहे. त्यांच्या कार्यामुळे आदिवासी भागातील अनेक शेतकरी आधुनिक व व्यावसायिक शेतीकडे वळले आहेत. याबाबत तालुका



कृषी अधिकारी सागर वाडकर यांनी सांगितले की, पेण तालुक्यातील दोन शेतकऱ्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी झालेली निवड ही संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. प्रतिकूल परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत यशस्वी प्रयोग करणाऱ्या हरिश्चंद्र पाटील आणि आदिवासी भागात शाश्वत व बाजाराभिमुख शेतीचा आदर्श निर्माण करणाऱ्या दामू मधे यांच्या कार्यातून इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळत आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर दोन्ही शेतकऱ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कुटुंबीय, सहकारी शेतकरी तसेच कृषी विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले. कृषी विभागाचे मार्गदर्शन, विविध योजनांचा लाभ, प्रशिक्षण व तांत्रिक सहकार्य यामुळेच शेतीत नवनवीन प्रयोग यशस्वीपणे राबविता आल्याचे त्यांनी सांगितले.

या उल्लेखनीय यशाबद्दल कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी सागर वाडकर, मंडळ कृषी अधिकारी अमित गावडे, सहाय्यक कृषी अधिकारी सबाजी पोटे, सतीश गायकवाड, अनंता पाटील, ऐश्वर्या शिंदे व प्रज्ञा खाडे यांनी दोन्ही पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मतदार याद्यांच्या अचूकतेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस सरसावली; पिंपळगाव येथे कार्यकर्त्यांना प्रशिक्षण

## तहसीलदार विशाल नाईकवाडे यांचे मार्गदर्शन




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२८, विंचूर (नाशिक) :** मतदार यादीत प्रत्येक पात्र नागरिकाची नोंद सुनिश्चित करण्यासाठी आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने मतदार जनजागृती मोहिमेला सुरुवात केली आहे. पिंपळगाव येथील भीमाशंकर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित विशेष बैठकीत पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना 'मतदार यादी विशेष सखोल पुनर्निरीक्षण' (एसआयआर) मोहिमेबाबत सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. आमदार दिलीप बनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीस कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या बैठकीत बोलताना तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करावयाच्या कार्यवाहीची माहिती दिली. पात्र नागरिकांची मतदार म्हणून नोंदणी करणे, नवमतदारांचा समावेश, यादीतील त्रुटी व दुरुस्त्या सुधारणे आणि बूथस्तरावरील पडताळणी (व्हॅरिफिकेशन) याविषयी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी आणि प्रत्येक पात्र व्यक्तीला मतदानाचा हक्क मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी बूथ पातळीवर सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन तहसीलदार नाईकवाडे यांनी केले.

### संघटन बळकटीकरणावर भर

राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष दिलीप आण्णा खैरे यांनी या प्रसंगी आपल्या आगामी आठ दिवसांच्या जिल्हा दौऱ्याची घोषणा केली. राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात आहे. या दौऱ्यात जिल्ह्यातील सर्व विधानसभा, तालुका व शहर स्तरावर बैठका घेऊन मतदार यादीच्या कामासोबतच पक्ष संघटना तळागाळापर्यंत अधिक मजबूत केली जाईल, असे खैरे यांनी स्पष्ट केले. या बैठकीला सामाजिक न्याय विभागाचे कार्याध्यक्ष बाळासाहेब कर्डक, महिला अध्यक्षा प्रेरणा बलकवडे, माजी सरपंच भास्करराव बनकर, तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे, विश्वासराव मोरे, नगरसेविका वेदांती सूर्यवंशी यांच्यासह दिलीपराव मोरे, शिवाजीराव ढेपले, संजय मोरे, माधवराव ढेमसे, सिद्धार्थ वनारसे, गणेश बनकर, अशोक गालफाडे, पुंडलिक घोलप, नाना पाटील शिरसाठ, बाळासाहेब बनकर, विठोबा राजे फाडे, डॉ. योगेश्वर चौधरी, तन्वीर राजे, चेतन कासव, आकाश पगार, राहुल कदम, सागर कुंदे, अजय गायकवाड, निखिल डेरले, डॉ. योगेश गोसावी, भालचंद्र भुजबळ, राहुल घोडे, सुशांत काकड, जीवन वाघ, भारत जाधव, रामेश्वर साबळे, मेघा दराडे, सुनीता राजोळे, अश्विनी मोगल, माधुरी एखांदे, विविध नगरपालिकांचे नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हाभर आठ दिवसांचा झंझावाती दौरा

राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष दिलीप आण्णा खैरे यांनी आजपासून जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघ, तालुका आणि शहर पातळीवर आठ दिवसांच्या दौऱ्याचा शुभारंभ केला आहे. या दौऱ्यात मतदार यादी विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहिमेला गती देण्यासोबतच, पक्षाची ध्येयधोरणे प्रत्येक बूथपर्यंत पोहोचवणे आणि संघटनात्मक बांधणी अधिक सक्षम करणे यावर मुख्य भर दिला जाणार आहे.

# कोल्हापूर येथील सोहळ्यात उमेश सुतार यांना राष्ट्रीय आदर्श कवीभूषण पुरस्कार प्रदान

**अक्षराज : रघुनाथ थोरात**

**दि.२८, उंब्रज (सातारा) :** 'देखणे ते हात त्यांना निर्मितीचे डोहाळे' या उक्तीप्रमाणे साहित्य क्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार आणि समाजाभिमुख लेखन करणारे कवीवर्य उमेश सुतार यांचे कार्य उल्लेखनीय असून ग्रामीण भागातील साहित्यिकांसाठी ते प्रेरणादायी ठरणार असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते, लेखक डॉ. प्रकाश कदम यांनी केले.

कोल्हापूर येथे कै. बसवंत नागू शिंगाडे चॅरिटेबल ट्रस्ट, बेळगाव यांच्या वतीने आयोजित नॅशनल एक्सलन्स गोल्ड स्टार अवॉर्ड २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार सोहळ्यात कविवर्य उमेश सुतार यांना आदर्श कवीभूषण या राष्ट्रीय गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अनाथांची माऊली डॉ. कल्पना इनामदार होत्या. विशेष उपस्थिती म्हणून सनदी लेखापाल, लेखक, कवी प्रा.डॉ.शंकर अंदानी, ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ.विक्रम शिंगाडे, अँड प्रिती कोळी, अशोककुमार आसोडे, डॉ.शितल खेत, कवी विवेक जोशी, प्रा.डॉ.मारुती पाटील, सुजय देसाई, डॉ.सविता अहिरे, डॉ.प्रसाद कुलकर्णी, प्रा. डॉ. प्रल्हाद बनकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कवीवर्य उमेश सुतार यांनी आपल्या काव्यलेखनातून समाजातील वास्तव, मानवी मूल्ये, नातेसंबंध, संस्कृती, ग्रामीण जीवन आणि सामाजिक जाणिवा यांचे प्रभावी चित्रण केले आहे. त्यांच्या कविता व साहित्य लेखनातून संवेदनशील विचारांना अभिव्यक्ती मिळाली असून वाचकांच्या मनात त्यांनी स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. साहित्य क्षेत्रातील त्यांचे योगदान सातत्यपूर्ण आणि प्रेरणादायी मानले जाते. त्यांच्या लेखणीने केवळ काव्यनिर्मितीच केली नाही, तर समाजप्रबोधनाचेही महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. साहित्याच्या माध्यमातून सकारात्मक विचार, मानवी मूल्यांची जपणूक आणि सामाजिक बांधिलकी यांचा संदेश देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले



### ३ राज्यातून उचित निवड

बेळगाव येथील कै.बसवंत नागू शिंगाडे चॅरिटेबल ट्रस्टने महाराष्ट्र, गोवा व कर्नाटक या ३ राज्यातून कवीवर्य उमेश सुतार यांची उचित निवड करीत त्यांना हा राष्ट्रीय सन्मान प्रदान केला आहे. त्यांच्या लेखणीचा साहित्यविश्वातील प्रवास अधिक समृद्ध होत राहो, अशी भावना सर्व स्तरांतून व्यक्त केली जात आहे.

आहे. त्यामुळेच त्यांची निवड आदर्श कविभूषण या पुरस्कारासाठी करण्यात आल्याचे डॉ. शिंगाडे यांनी यावेळी सांगितले.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उमेश सुतार यांचा सपत्नीक सत्कार करीत कोल्हापुरी फेटा, गौरवपत्र, सन्मानचिन्ह आणि पदक प्रदान करण्यात आला. या राष्ट्रीय सन्मानामुळे चाफळ परिसरासह जिल्ह्यातील साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध साहित्यिक, कवी, लेखक, सामाजिक कार्यकर्ते आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी उमेश सुतार यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आळंदीत पल्स पोलिओ मोहिमेच्या लसीकरणास उत्साही प्रतिसाद

**अक्षराज : अर्जुन मेदनकर**

**दि.२८, आळंदी (पुणे) :** राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमे अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने आळंदी परिसरातील १९ केंद्र वर बस पोलिओचे लसीकरण करण्यात आले. याच पालकांनी मोठा प्रतिसाद देत आपल्या बालकांना घेऊन लसीकरणासाठी येऊन लसीकरण करून घेतले आळंदी येथील आयोजित लसीकरण मोहिमेची पाहणी करण्यासाठी अतिरिक्त संचालक डॉ.



संदीप सांगळे, डचज डॉ चेतन खाडे यांनी ग्रामीण रुग्णालय आळंदी आणि माऊली मंदिर पोलिओ बूथ केंद्र येथे भेट देऊन काम काजाची माहिती घेत संवाद साधला. यावेळी आळंदी ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ उर्मिला शिंदे यांचे सह नियुक्त कर्मचारी, आरोग्य सेवक उपस्थित होते. आळंदी खेड आणि आळंदी हवेली भागातील १९ केंद्रावर लसीकरणाची सोय करण्यात आली होती. परिसरातील उद्दिष्ट पेक्षा जास्त लसीकरण करण्यात आल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.उर्मिला शिंदे यांनी सांगितले. उत्साहात लसीकरण अभियान राबविण्यात आले. आळंदी नगरपरिषद उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, कालिदास तापकीर, रुग्ण हक्क समिती सदस्य डी.डी.भोसले पाटील, ग्लोबल समाज सहाय्यक समितीचे मार्गदर्शक राम चंद्रकाका कुऱ्हाडे पाटील, आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, गोविंद ठाकूर आदी मान्यवर यांनी सदिच्छा भेट देत मुलाना पल्स पोलिओ डोस देत, कामाची माहिती घेत पाहणी केली. लसीकरण दिनी ६ हजार २५८ लाभार्थ्यांचे उद्दीष्ट होते. यात ६ हजार १३४ लाभार्थ्यांना लस पाजण्यात आली. sunare ९८ टक्के काम लसीकरण दिनी सर्व केंद्र मिळून झाले. असे डॉ.उर्मिला शिंदे यांनी सांगितले.